ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-I) JAN – FEB 2024

Original Research Article

# ब्रिटीश राजवटीतील महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

*** डॉ. किरण सदाशिव चव्हाण,**

* के.एम.अग्रवाल महाविद्यालय, इतिहास विभाग, कल्याण

**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून महाराष्ट्रात शेतीला पूरक असे अनेक उद्योगधंदे सुरु झाले. अलुतेदार आणि बलुतेदार हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया मानला जात. मध्ययुगात शेतीच्या विकासामुळे लहान शहरांचा विकास झाला.

मोघल सम्राटांनी व्यापार व उद्योगास संरक्षण दिले. सोन्या-चांदीच्या नाजूक दागिन्यांपासून ते हत्यारे, कलाकुसरीच्या झिलईदार भांडी, विटभट्टीचे अनेक व्यवसाय केले जात. उमराव, जमिनदार, अमीर यांच्याकडून उंची वस्तुंना मोठी मागणी होती. मराठ्यांच्या काळात देखील "गाव" हा प्रमुख घटक होता. गावची आर्थिक व्यवस्था स्वतंत्र होती. जमिन महसूल हा कराचा महत्त्वाचा मार्ग होता. जमिनीच्या उत्पादन क्षमतेनुसार शेतसारा वसुल केला जात. याशिवाय व्यापार व प्रासंगिक कर आकारले जात.

**Copyright © 2024 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**ब्रिटीश अर्थव्यवस्थेचा प्रारंभ:**

१८१८ साली मराठी सत्तेचा शेवट झाला आणि महाराष्ट्राची सूत्रे हाती घेणाऱ्या "एलफिस्टनला देखिल आपण एक दिवस परत जाणार आहोत, याची जाणीव होती."[१] इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज या तीन परकीय सत्तांचा प्रभाव महाराष्ट्रावर होता. "इंग्रजपूर्व स्वयंपूर्ण असणाऱ्या महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला ब्रिटीश काळात दुय्यमत्व स्वीकारणे अपरिहार्य होते."[२] मराठे काळात, "विणकाम, धातुकाम, लाकुडकाम, लोखंड, पितळ, सोनेचांदीचे व्यवसाय"[३] हे महाराष्ट्रातील प्रमुख उद्योग धंदे होते. साड्या, रेशीम वस्त्रे, कापड, पासोडी, पगड्या, कांबळी इ.चे उत्पादन मोठ्या प्रमाणात केले जात. श्रीमंतीच्या प्रदर्शनासाठी, बांगड्या, मंगळसूत्र, बाजुबंद, साखळ्या, नथनी, तोडे इ. दागिने वापरत.

१) गणेश राऊत - महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास डायमंड प्रकाशन पुणे पृ.क्र. २०७.

२) उपरोक्त - पृष्ठ क्र. २०८.

३) भिडे, पाटील, थोरात – महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास फडके प्रकाशन, कोल्हापूर पृ.क्र. १७.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-I) JAN – FEB 2024

Original Research Article

"चोळ, दाभोळ, कल्याण, नालासोपारा ही प्रमुख बंदरे तर पैठण, नाशिक, अमरावती, वाशिम ह्या प्रमुख बाजारपेठा प्रसिध्द होत्या."[४]

महाराष्ट्रातील इंग्लडच्या अर्थव्यवस्थेचे तीन भागात विभाजन केले जाते.

१) १७५७ ते १८१३ - व्यापारी धोरणाचा काळ

२) १८१३ ते १८५७ - खुले व्यापारी धोरण

३) १८५७ नंतरचा - आर्थिक साम्राज्यवादाचा काळ

या काळात महाराष्ट्रावर राजकिय व आर्थिक वर्चस्व टिकवण्यासाठी इंग्रजांनी प्रयत्न केले.

१७५७ ते १८१३ या काळात इंग्रजांनी राजकिय सत्ता भक्कम पायावर उभी करण्याचा प्रयत्न केला.

१८१३ ते १८५८ या काळात औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलदार वर्ग उदयास आला.

"१८५७ उठावाला अपयश प्राप्त झाल्याने इंग्रजांनी महाराष्ट्राचे अधिकाधिक आर्थिक खच्चीकरण करण्याचा प्रक्रियेला सुरवात झाली."[६]

या काळात म. फुले यांनी समाजातील कष्टकरी वर्गाच्या शोषणाची व गरिबीची समस्या मांडली.

"न्या. रानड्यांनी सार्वजनिक सभेच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण केले."[७]

याच काळात "इंग्रजांनी चाच्यांचा बंदोबस्त केल्याने व्यापाऱ्यांना पुर्वीसारखा लुटीचा धोका राहिला नाही."[८] चीन बरोबर चंदनाचा व कापसाचा किफायतशीर व्यापाराबरोबर मुंबईतून मोठ्या प्रमाणात अफुची निर्यात होऊ लागली.

४) भुषण देशमुख - महाराष्ट्राची कला आणि संस्कृती सकाळ प्रकाशन पुणे पृष्ठ क्र. ४९.

५) उपरोक्त - महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास पृष्ठ क्र. २०९

६) गणेश राऊत - महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, डायमंड प्रकाशन, पुणे, पृष्ठ २१२.

गणेश राऊत - उपरोक्त पृष्ठ २२१.

७) य.दि.फडके - विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ १७.

८) डॉ.अनिल कठारे - आधुनिक भारताचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, पृष्ठ २५३.

आर्थिक दृष्टीकोनातून लॉर्ड डलहौसीने रेल्वे व तारायंत्रे याचा विकास केला. १८५३ मध्ये मुंबई-ठाणे पहिला रेल्वे मार्ग सुरु झाला. "कलकत्ता ते दिल्ली ग्रॅटटॅक रोड व गंगा नदीवर कालवा बांधला."[९]

"१८४२ मध्ये मुंबई व कलकत्ता हि शहरे रस्त्यांनी जोडली गेली."[१०] १९०८ मध्ये देशातील रेल्वेची लांबी २८८ मैल

होती. त्यामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला गती मिळाली.

❖ **चहा उद्योग** –

रॉबर्ट ब्रूस याला आसाममध्ये प्रथम चहाचे रोप आढळून आले. १९३४ मध्ये कंपनीने आसाम मध्ये "चार्लटनच्या नेतृत्वाखाली चहाची लागवड सुरु केली."[११] इंग्लंडमध्ये १२ फेब्रुवारी १८३९ मध्ये चहाची कंपनी स्थापन झाली. १८५९ ते १८६५ देशात २० चहा कंपन्यांची स्थापना झाली. याच काळात ८ लाख हेक्टर जमिनीवर चहाची लागवड झाली व इंग्रजांना ६० कोटी पौंड पेक्षा अधिक उत्पन्न मिळाले.

❖ **नीळ उद्योग** –

प्रथम बंगाल मधील शेतकऱ्यांना निळीची लागवड करण्यासाठी कर्ज पुरवठा करण्यात आला. कर्जफेड न करणाऱ्या शेतकऱ्यांना वेठबिगार बनविण्यात आले. प्रसंगी त्यांच्या जमिनी जप्त केल्या जात. इंग्रज व्यापारी जमिनीचे मालक बनले. "१८६० मध्ये बंगाल मधील शेतकऱ्यांनी हेमचंद्रकार, दिगंबर विश्वास यांच्या नेतृत्वाखाली उठाव केला."[१२]

❖ **कापड उद्योग** –

११ जुलै १८५१ कासवजी दावर यांनी मुंबईमध्ये पहिली कापड गिरणी सुरु केली. त्यानंतर माणेकजी पेटीत, नथुभाई दिनशॉ, १८६० मध्ये मंगळदास नथुभाई यांनी आपल्या मालकीची गिरणी सुरु केली.

पण भारतीय कापडउद्योग इंग्लंडच्या कापड उद्योगाशी स्पर्धा करू शकला नाही. १८७१ नंतर कापड उद्योग तेजीत आला. "१८८० मध्ये मुंबई प्रांतात ८० कापड गिरण्या होत्या."[१३] कामगारांची संख्या ३९५३७ होती. "१९१४ मध्ये कापड उद्योगात भारताचा जगात ४ था क्रमांक होता."[१४] पहिल्या महायुद्धानंतर सरकारने कापड उद्योगाला संरक्षण सुरु केले.

९) डॉ.बी.एन.सरदेसाई - आधुनिक महाराष्ट्र फडके प्रकाशन कोल्हापूर, पृ.१३८.
१०) डॉ.कोठारे - उपरोक्त पृष्ठ क्र. ८५०.
११) डॉ.बी एन.सरदेसाई - उपरोक्त पृष्ठ क्र. ७१.
१२) य.दि.फडके - फडके प्रकाशन, पृष्ठ क्र. १७.
१३) अनिल कोठारे - आ.भारताचा इतिहास कल्पना, प्रकाशन नांदेड, पृ.क्र. ८५०.
१४) य.दि.फडके - उपरोक्त पृष्ठ क्र. २७

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-I) JAN – FEB 2024

Original Research Article

❖ **ताग उद्योग** –

जॉर्ज ऑकलंड याने बंगालमध्ये रिश्रा गावी पहिली ताग गिरणी सुरु झाली. तागाचे उत्पादन महाराष्ट्रात विशेष नव्हते.

एकोणीसाव्या शतकाच्या शेवटी मध्यप्रांत, वऱ्हाडमध्ये उद्योगधंद्याचा विकास झाला नाही. "मँगेनीज व कोळसा या प्रांतात मोठ्या प्रमाणावर होता."[१५] १८७७ मध्ये जमशेदजी टाटांनी नागपूरला एम्प्रेस गिरणी सुरु केली.

❖ **साखर उद्योग** –

बॉम्बे कर्नाटक मध्ये साखरेचे उत्पादन केले जात. अहमदनगर व बेळगाव जिल्ह्यात उसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात केले जात. "१९१८ अहमदनगर जिल्ह्यात बेलापूर येथे पहिला साखर कारखाना सुरु झाला."[१६] १९३२ मध्ये साखर उद्योगाला संरक्षण देणारा पहिला कायदा केला. १९१३ ते १९४० या काळात १२ साखर कारखाने महाराष्ट्रात सुरु झाले. फलटण, वालचंदनगर, कोपरगाव, कोल्हापूर, रावळगाव, श्रीरामपूर हे साखर कारखान्यांचे प्रमुख केंद्र होते. आज महाराष्ट्र साखर उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. विठ्ठलराव विखे-पाटील, तांबवेकर, डॉ.धनंजय गाडगीळ, यशवंतराव चव्हाण यांनी साखर उद्योगांचा पाया महाराष्ट्रात घातला.

१५) डॉ.बी एन.सरदेसाई - आधुनिक महाराष्ट्र फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ.क्र. १४६.

१६) उपरोक्त - य.दि.फडके.

**सारांश:**

इंग्रज अमदानीत झालेल्या दळणवळण वाहतुक, संदेशवहन, तारायंत्र, विद्युतपुरवठा यामुळे महाराष्ट्रात औद्योगिक क्षेत्र उदयास आले आणि इंग्रजांना मोठ्या प्रमाणात कच्चा माल उपलब्ध होऊन औद्योगिक विकास जलदगतीने झाला. जहाज बांधणी व्यवसायामुळे अवजड मालाची वहातुक सोपी झाली. मुंबई, पुणे, सोलापूर, नागपूर, इचलकरंजी, भिवंडी या औद्योगिक शहरांचा विकास झाला. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा पाया इंग्रज अमदानीत घातला गेला. इंग्रजांनी जरी आर्थिक शोषण केले तरी मोठ्या अवजड उद्योगांमुळे महाराष्ट्र देशातील अग्रेसर प्रांत म्हणून नावारूपास आला.

**संदर्भ ग्रंथ:**

१) पवार जयसिंगराव, (सपा.), राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.

२) य.दि.फडके – वि. शतकातील महाराष्ट्र खंड १,२, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३) ग.बा.सरदार – महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी, पुणे.

४) ग.प्र.प्रधान – आगरकर लेखन संग्रह साहित्य अकादमी, ७वी आवृत्ती.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– I (Special Issue-I) JAN – FEB 2024

Original Research Article

५) भिमराव कुलकर्णी – अस्मिता महाराष्ट्राची, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई.

६) सत्यशोधक समाजाचा इतिहास – महेश जोशी १९८७.

७) लालजी पेंडसे – महाराष्ट्राचे महामंथन – साहित्य सहकार संघ मुंबई प्रकाशन, १९६५.

८) Sumit Sarkar – Writing Social History.

९) V.N.Nalawade – The life and work of Deshbhakta Keshavrao Jedhe.

१०) कुलकर्णी पु.बा. नानाशंकर यांचे चरित्र १९५९.

---

*Cite This Article:*

**डॉ. चव्हाण क. स. (2024).** *ब्रिटीश राजवटीतील महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी*. In Educreator Research Journal: Vol. XI (Number I, pp. 260–264). **ERJ.** https://doi.org/10.5281/zenodo.10714889